International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No.6 July-Aug 2024

# पंडिता रमाबाई यांच्या जीवन व कार्याचा ऐतिहासिक आढावा

**अमित अशोक पाटील**
संशोधक विद्यार्थी
**Corresponding Author- Anuradha अमित अशोक पाटील**
**Email:** aapatil१४४१@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14059318**

**प्रस्तावना**:

पंडिता रमाबाईंचा जन्म कर्नाटक मधील माळहेरंजी येथे एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे व आईचे नाव अंबाबाई हे होते. वडील आनंदशास्त्री हे पुरोगामी विचारांचे असल्याने तत्कालीन समाजमध्ये स्त्री शिक्षण निषिद्ध असताना सुद्धा समाजाचा रोष पत्करून त्यांनी स्वतःच्या मुलीलाच म्हणजेच रमाबाईंना संस्कृत व वेद पुराणे इत्यादींचे शिक्षण दिले. परिणामी रमाबाईंचा उदय एका विदुषीच्या स्वरूपात झाला. त्यांना खूप विद्वत्ता प्राप्त झाली परंतु पूर्ण समाजाने मात्र आनंदशास्त्री यांच्या कुटुंबास बहिष्कृत केले. त्यानंतर अनंतशास्त्री यांनी पूर्ण हिंदुस्तानच्या तीर्थयात्रेस जाण्याचे ठरवले व त्यांनी तीर्थयात्रेस प्रारंभ केला. परंतु मद्रास येते अनंतशास्त्री तीर्थ यात्रेदरम्यान १८७६/७७ साली भयंकर दुष्काळ पडला. त्या दुष्काळात त्यांचे निधन झाले. त्यानंतर रमाबाई आपला भाऊ श्रीनिवास यांचे बरोबर पुराने, व्याख्याने देत फिरू लागल्या. व्याख्यानावर आपला उदरनिर्वाह करू लागल्या. त्या पूर्ण देशभर व्याख्याने देत फिरू लागल्या. अल्पावधीतच त्यांची ख्याती सर्वदूर पसरली. त्यानंतर त्यांना कलकत्ता विश्वविद्यालयामध्ये अनेक विद्वानांनी पाचारण केले व तेथे त्यांनी दिलेल्या व्याख्यानांनी तेथील सर्व विद्वान भारावून गेले. तिथे रमाबाईंना 'पंडिता' ही पदवी दिली. पुढे भाऊ श्रीनिवास याचेही निधन झाले. भावाच्या निर्णयानंतर त्या खूप एकाकी पडल्या व त्यांनी बाबू बिपिन बिहारी रास मेघावी या बंगाली वकिला सोबत विवाह केला. हा विवाह आंतरप्रांतीय, आंतरजातीय असल्याने पुन्हा रमाबाईंना समाजाचा खूप रोष सहन करावा लागला. पण तरीही त्यांची सामाजिक कार्याची व सुधारणावादी वृत्ती डगमगली नाही. त्यांनी पुढे ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्याने त्यांची सामाजिक सुधारण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात असून सुद्धा त्यांना समाज सुधारण्याच्या श्रेय वादापासून उपेक्षित राहावे लागले. हिंदू समाजाने मात्र त्यांच्या सामाजिक सुधारण्याच्या कार्याला अत्यल्प महत्त्व दिले. अशा या महान स्त्री समाजसुधारकाच्या जीवन व कार्याचा आढावा आपण सविस्तर पुढे पाहणार आहोत.

**उद्दिष्टे:**

१. पंडिता रमाबाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकणे.

२. पंडिता रमाबाई यांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्याचा आढावा घेणे.

३. पंडिता रमाबाई यांच्या समाज सुधारणेतून झालेल्या बदलांचा आढावा घेणे.

**पंडिता रमाबाई जीवन कार्य सविस्तर आढावा:**

**आर्य महिला समाजाची स्थापना:**

१८८२ मध्ये रमाबाई पुण्यात आल्या. तिथे त्यांची जाहीर व्याख्याने व पुराने होत. स्त्री समाजाच्या सर्वांगीण प्रगतीच्या हेतूने ३० एप्रिल १८८२ रोजी पुण्यात तर ३० नोव्हेंबर १८८२ रोजी मुंबईत आर्य महिला समाजाची स्थापना केली. पुढे आर्य महिला समाजाच्या कार्याचा विस्तार सोलापूर, पंढरपूर, अहमदनगर, बार्शी व पुढे पूर्ण महाराष्ट्रभर झाला. रमाबाईंनी संपूर्ण महाराष्ट्र स्त्री शिक्षणाचे प्रसारासाठी प्रयत्न केले. त्यांच्याविषयी न.चिं.केळकर म्हणतात, "बाई धीट, दुसऱ्यावर छाप टाकणारे व हजर जबाबी असल्याने कोणी तिच्याशी प्रत्यक्ष भेटून वाद किंवा निषेध केला नाही".

**रमाबाईंची हंटर आयोगा पुढील साक्ष (१८८३)**

प्राथमिक शिक्षणाच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी हंटर कमिशनची स्थापना १८८२ ला झाली. त्याच्या अध्यक्ष विल्यम हंटर हे होते. या कमिशन पुढे रमाबाईंनी साक्षी दिली व भारतीय शिक्षण पद्धतीतील दोष दाखवून दिले व खालील महत्त्वाचे मुद्दे मांडले.

१. मराठी व इंग्रजीचे बिनचूक ज्ञान असणाऱ्या शिक्षिका असाव्यात.

२. सर्व आवश्यक उपकरणांनी युक्त वसतिगृहे असावीत.

३. स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण देण्यात यावे.

पंडिता रमाबाई कडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार

१८८३ साली रमाबाई आपल्या मनोरमा या मुली सोबत इंग्लंडला गेल्यावर तेथील ब्रिटिश पुरोगामी ख्रिश्चन धर्म, सामाजिक सुधारणा, चालीरीती, स्त्रियांची स्थिती, रूढी परंपरा पाहून ख्रिश्चन धर्मावर प्रभावी झाल्या व त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकार करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी जिराल्डीन यांच्या साक्षीने ख्रिस्ती धर्म स्वीकारला.

**पंडिता रमाबाई व अमेरिकेचा प्रवास:**

रमाबाई इंग्लंडमध्ये असताना त्यांच्या ज्ञानाची कीर्ती सर्वदूर पसरली. त्यामुळे त्यांना अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथील स्त्रियांच्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रमुखांनी अमेरिकेला भारतातील पहिल्या महिला डॉक्टर डॉ.आनंदीबाई जोशी यांच्या दीक्षांत समारंभासाठी निमंत्रण दिले व त्या अमेरिकेला गेल्या. स्त्रियांची शिक्षणातील प्रगती पाहून त्या भारावून गेल्या. अमेरिकेत राहून त्यांनी 'द हाय कास्ट हिंदू वुमन' या पुस्तकाचे लेखन केले व यातून भारतातील बालविधवांबद्दल सहानुभूती निर्माण केली.

**शारदा सदनची स्थापना:**

रमाबाईंनी अमेरिका व इंग्लंडच्या प्रवासातून तेथील अनेक पुरोगामी व्यक्ती व संस्थाकडून आपल्या सामाजिक कार्यासाठी मोठ्या प्रमाणात देणगी मिळवली व आपल्या समाज सुधारणा कार्याचा प्रसार करण्यासाठी त्या परत भारतात परतल्या व त्यांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी शारदा सदन या संस्थेची १८८९ साली पुण्यात स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अनेक बाल विधवांना अश्रय दिला. त्यांना शिक्षण दिले व त्यांना स्वबळावर आयुष्य जगण्यासाठी लायक बनवले. त्यातील अनेक स्त्रियांचे पुनर्विवाह लावून दिले. त्यातीलच एक गोदुबाई ही विधवा. तिचा धोंडो केशव कर्वे यांच्याशी पुनर्विवाह घडवून इतिहास रचला. रमाबाईंनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला त्यांचा इतर मुलीवर सुद्धा प्रभाव पडला. त्यामुळे अनेक विधवांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. त्यामुळे शारदा सदन या संस्थेवर टीकेची झोड समाजातून उठली. यामुळे त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्याला जितकं हवं तितकं महत्त्व तत्कालीन समाजाने दिले नाही.

**भीषण दुष्काळात केली गेलेली मदत:**

१८९७ - १८९९ या दरम्यान गुजरात, मध्यप्रदेश येथे भीषण दुष्काळ पडला. हजारो लोक मृत्यू पावले. तेथील शेकडो अनाथांना त्यांनी आश्रय दिला व शिक्षण देऊन स्वावलंबी बनवले.

**पंडिता रमाबाईंची वाङ्मय निर्मिती:**

रमाबाईंना समाज सुधारण्याचे कार्य करत असतानाच स्त्रियांची व्यथा मांडण्यासाठी त्यांची स्थिती दर्शनासाठी लिखाण सुद्धा केले ते पुढील प्रमाणे -

१. स्त्री धर्मनिती (१८८२)

२. इंग्लंडचा प्रवास

३. द हाय कास्ट हिंदू वुमन (१८८७)

४. युनायटेड स्टेटची लोकस्थिती व प्रवास वृत्त (१८८९)

५. बायबलचे मराठीत भाषांतर (ग्रीक व हिब्रू मधून)

**पंडिता रमाबाई यांच्या कार्याचा परिणाम**

पंडिता रमाबाई यांचेकडून प्रेरणा मिळाल्यानंतर महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री उद्धाराचे कार्य जोमाने सुरू केले. मेरीबाई उर्फ शेवंतीकाबाई निकंबे यांनी मुंबईत अनाथ बाल विधवांसाठी एक शाळा स्थापन केली. सुंदराबाई पवार व रमाबाई असोसिएशनच्या प्रमुखांनी जीवनभर स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. इंडोनेशियाची राजकन्या कार्टीनी हिने एका वर्तमानपत्रात पंडित रमाबाईंच्या कार्याविषयी लेख वाचला व कार्टीनी हिने सुद्धा प्रेरणा घेतली व तेथे स्त्री शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले.

**मूल्यमापन:**

पंडिता रमाबाई यांच्या कार्याचा गौरव ब्रिटिश सरकारने १९१९ साली 'कैसर-ए-हिंद' ही पदवी देऊन केला. पंडिता रमाबाईंच्या कार्याचा आढावा हे स्पष्ट करतो की कोणी कितीही टीका केली असली तरी त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. पंडिता रमाबाई खऱ्या अर्थाने एक महान स्त्री सुधारक होत्या. स्त्रियांच्या संदर्भात अनेक जाचक रूढी, परंपरा, करमट बंधनाचा पुरस्कार करणाऱ्या पुरुषप्रधान हिंदू समाजात एक उच्चवर्णीय हिंदू विधवेने स्त्रियांसाठी प्रचलित सनातन समाजाविरुद्ध जाऊन स्त्री उद्धाराचे केलेले कार्य उल्लेखनीय आहे. अशा या महान स्त्रीच्या कार्याची ओळख करून देणे ही काळाची गरज आहे. पण त्यांनी केवळ ख्रिस्ती धर्म स्वीकारून कार्य केले यामुळे त्यांना या देशाने उपेक्षित ठेवले. या लेखाच्या माध्यमातून त्यांच्या नशिबी आलेली उपेक्षा नाहीशी होईल यासाठीच हा लेखनप्रपंच.

**संदर्भ ग्रंथ :**

१. टिळक देवदत्त नारायण, महाराष्ट्राची तेजस्विनी : पंडिता रमाबाई, नागरिक प्रकाशन, नाशिक, १९६०.

२. कानिटकर काशीबाई, डॉ.सौ.आनंदीबाई जोशी यांचे चरित्र

३. पंडिता रमाबाई, युनायटेड स्टेट्सची लोकस्थिती व प्रवासवृत्त, भाग -१ वि. मा. वाळवेकर मुंबई १९८९.

४. कोसंबी मीरा, श्री गंधर्व वेद प्रकाशन ,पुणे